# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **WashimCity**

**Date of Good Work done** :- **19/08/2022**

**Brief of the work done :-**

उच्चभ्रू वस्तीतील कुंटनखान्यावर पोलिसांचा छापा ; 2 आरोपीस अटक, 5 महिलांची सुटका.

# उच्चभ्रु वस्तीतील कुंटणखाण्यावर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ शहरातील एका उच्चभ्रु वस्तीमधील घरामध्ये देहविक्रीच्या व्यवसायाकरिता काही महिलांना आणून त्यांच्याकडून अनैतिक काम करुन घेत असल्याची माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १८ ऑगस्ट रोजी दुपारी ४:३० वाजताचे सुमारास कुंटणखाण्यावर छापा टाकला. यावेळी पोलीसांना त्याठिकाणी अनैतिक व्यापार चालविणारी एक महिला व अन्य पाच महिलांसह दोन पुरुष ग्राहक आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले.

शहरातील वाशिम ते झाकलवाडी रोडवरील लाखाळा, माऊली नगर या परिसरात एक महिला पक्क्या घरामध्ये काही महिलांना आणून त्यांच्याकडून अनैतिक व्यापार काम करुन घेत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. या माहितीवरुन स्त्रीयांचा व मुलींचा अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अन्वये कायदेशिर कारवाई



करण्याकरिता बनावट ग्राहक यांना बोलावुन त्यांना मिळालेल्या माहितीवरुन छापा टाकण्यात आला.

या कारवाईत कुंटणखाणा चालविणारी एक महिला व अनैतिक काम करणाऱ्या पाच महिलांना तसेच दोन पुरुष ग्राहकांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख २,५९,५०० रुपये, तीन मोबाईल किंमत अंदाजे ३० हजार रुपये व इतर साहीत्य असा एकुण २,९१,५५० रुपयाचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी रिंकु उर्फ छाया नामदेव उबाळे व दोन ग्राहकांविरुध्द कायदेशिर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी दिली.

वाशिम शहरातील काही भागासह उच्चभ्रु वस्तीत देहविक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून करण्यात येत होत्या. गत काही दिवसापुर्वी शेलुबाजार रोडवरील देहविक्रीचा व्यवसाय करणाऱ्या विरूध्द कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर झाकलवाडी रोडवरील कुंटणखाण्यावर पोलीसांनी कारवाई केली.

सदर कारवाई पोलीस अधिक्षक बच्चनसिंह, अपर पोलीस अधिक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरिक्षक सोमनाथ जाधव, एपीआय प्रमोद इंगळे, पीएसआय शब्बरीखाँ पठाण, स्वाती इथापे, जमादार किशोर चिंचोळकर, सुनिल पवार, दीपक सोनवने, पोलीस नाईक राजेश राठोड, अमोल इंगोले, गजानन गोटे, प्रविण राऊत, डिगांबर मोरे, अविनाश वाढे, संतोष शेनकुडे, महिला पोलीस जमादार सुषमा तोडकर, रेश्मा ठाकरे, फॉरेन्सीक लॅबचे एपीआर रोहीणी रिंढे, महेश आखरे, अविनाश इंगोले, संदीप सरोदे यांच्या पथकाने केली. (ता.प्र.)